स्थापना : १९७८

संहती कार्यसाधिका । शिलं परं भूषणम्

ISO 9001 :2015

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, रेठरे बु.।। चे

# कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु. ।।


मु. पो. शिवनगर (रेठरे बु।।), ता. कराड, जि. सातारा.

फोन : ०२१६४ – २६६३४६

Email : kmr_sspm@yahoo.com  Web site : www.krishnamahavidyalaya.com


585

Certificate Course





शिक्षणमहर्षी स्व. जयवंतरावजी भोसले (आप्पासाहेब)

Open Gym



Tree plantation



Obstacle Course



## SENIOR COLLEGE

# PROSPECTUS 2019 - 2020

## माहिती पत्रक २०१९-२०२०

CamScanner

# ❊ महाविद्यालय विकास मंडळ ( College Development Board) ❊

| | |
|---|---|
| १) मा. डॉ. सुरेश जयवंतराव भोसले | अध्यक्ष, शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ |
| २) मा. श्री. विलासराव तुकाराम पाटील | उपाध्यक्ष, शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ |
| ३) मा. श्री. दिलीपराव रामराव पाटील | सचिव |
| ४) मा. डॉ. अतुल सुरेशराव भोसले | सदस्य, संशोधन क्षेत्र तज्ञ |
| ५) मा. विनायक सुरेशराव भोसले | सदस्य, शिक्षण क्षेत्र तज्ञ |
| ६) मा. श्री. सर्जेराव रामचंद्र यादव | सदस्य, औद्योगिक क्षेत्र |
| ७) मा. डॉ. धनाजी सुरेशराव दळवी | नॅक समिती |
| ८) मा. डॉ. प्रविणचंद दिनकर भाकरे | शिक्षक प्रतिनिधी |
| ९) मा. श्री. बाळासाहेब शंकर माने | शिक्षक प्रतिनिधी |
| १०) मा. कु. माधवी सुरेंद्र पवार | महिला शिक्षक प्रतिनिधी |
| ११) मा. सौ. मंदा मनोज घाटगे | माजी विद्यार्थीनी प्रतिनिधी |
| १२) मा. श्री. अशोक श्रीपती लाड | शिक्षकेत्तर प्रतिनिधी |
| १३) डॉ. चंद्रकांत बाबुराव साळुंखे | सचिव, कृष्णा महाविद्यालय, शिवनगर |





संहती कार्यसाधिका । शीलं परं भूषणम् ।

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, रेठरे बु।। चे

# कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।

मु. पो. शिवनगर (रेठरे बु।।) ता. कराड, जि. सातारा फोन : (०२१६४) २६६३४६

Email : kmr_sspm@yahoo.com, Web Site : www.krishnamahavidyalaya.com

| | | |
|---|---|---|
| १) | प्रस्तावना | Introduction |
| २) | प्रवेश | Admission |
| ३) | विविध अभ्यासक्रम | Courses of Studies |
| ४) | फी चा तपशील | Fee Chart |
| ५) | फी परतावा | Refund of Fees & Deposits |
| ६) | शिस्त व वर्तणूक | Discipline & Code of Conduct |
| ७) | विद्यापीठ परिक्षेसबंधी नियम | University Examination |
| ८) | ग्रंथालय व अभ्यासिका | Library & Study-room |
| ९) | जिमखाना, एन.एस.एस., एन.सी.सी. | Gym., N.S.S. & N.C.C. |
| १०) | वसतिगृह | Hostel |
| ११) | विद्यार्थी कल्याण-शिष्यवृत्ती, सवलती | Scholorships & Freeships |
| १२) | उपहारगृह | Canteen |
| १३) | प्राध्यापक वर्ग | List of Faculty Members |
| १४) | प्रशासकीय सेवक वर्ग | Administrative Staff |
| १५) | प्रवेश अर्ज | Admission Form |
| १६) | हमीपत्र | Guarantee Form |
| १७) | प्रतिज्ञापत्र | |
| १८) | ओळखपत्र अर्ज | Identity Form |
| १९) | | Anti-Ragging Form |



CS CamScanner

# * माहिती-पत्रक *

## १. प्रस्तावना (Introduction) :-

कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या परिसरातील शेतकऱ्यांच्या मुला-मुलींची शिक्षणाची सोय अल्प खर्चात व्हावी या उदात्त हेतूने १९६३ साली शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना झाली. स्व. जयवंतरावजी भोसले (आप्पासाहेब) यांच्या प्रेरणेने कृष्णेच्या परिसरातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन शेतकऱ्यांच्या मुलांसाठी चालविलेला हा ग्रामीण भागातील एक आगळा वेगळा शैक्षणिक प्रकल्प आहे.

शिक्षण पध्दती, शिस्तबध्द, संस्कारक्षम शिक्षण व उत्कृष्ठ निकालाची परंपरा यामुळे संस्थेच्या शाखामधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अल्पावधीतच ५००० च्या वर गेली. संस्थेमार्फत सध्या कृष्णा महाविद्यालय (ज्युनिअर, सिनिअर, व्होकेशनल), छ. संभाजी माध्य. विद्यालय, सौ. ताराबाई मा. मोहिते विद्यालय, छ. संभाजी प्राथमिक विद्यालय, शिशु विकास मंदिर, जयवंत कॉलेज ऑफ इंजिनिअरींग व जयवंतराव भोसले पॉलिटेक्निक या शाखा चालविल्या जातात.

### • महाविद्यालय :-

कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या परिसरातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून संस्थेने ६ जून १९७८ पासून कृष्णा महाविद्यालय सुरु केले. आदर्श व सर्वकष शिक्षणामुळे महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आज जवळपास १७०० चे वर गेली आहे. महाविद्यालय शिवाजी विद्यापीठाशी संलग्न आहे.

कला, वाणिज्य व शास्त्र शाखेचे इ. ११ वी ते बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. पर्यंतचे वर्ग सुरु आहेत. या महाविद्यालयात लायब्ररी, अभ्यासिका, सभागृह, जिमखाना, मल्टी जिम, आय.टी., संगणक, वसतिगृह, उपहारगृह इ. सुविधा उपलब्ध आहेत.

उत्कृष्ठ निकाल ही महाविद्यालयाची परंपरा असून महाविद्यालयातील विद्यार्थी सातत्याने विद्यापीठात क्रमांक प्राप्त करीत आहेत. एच्.एस.सी. (१२ वी) चे सर्व शाखांचे निकाल उत्तम आहेत. तसेच बी.एस्सी. भाग ३ चा निकाल सातत्याने १०० % आहे.

## २. प्रवेश (Admission Guidelines) :-

### २.१ प्रवेशासाठी आवश्यक बाबी :-

महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी पुढील बाबींची पूर्तता केली पाहिजे. महाविद्यालयाकडे सादर करावयाचा प्रवेश अर्ज काळजीपूर्वक वाचून मजकूर बिनचूक भरावा. (विशेषतः एकदा निवडलेले विषय पुन्हा कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाहीत).

### ब) वरिष्ठ महाविद्यालय प्रवेश

१) प्रथम वर्ष बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. ची प्रवेश प्रक्रिया शासन नियमानुसार व विहित वेळापत्रकाप्रमाणेच पूर्ण केली जाईल. (माहितीपत्रक विक्री - प्रवेश अर्ज स्वीकारणे, गुणवत्ता यादी तयार करणे व गुणवत्ता यादीनुसार प्रवेश देणे इत्यादी)

२) बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. भाग १ मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी इ. १२ वी चे मुळ गुणपत्रक व शाळा सोडल्याचा दाखला (Leaving Certificate) व त्यांच्या दोन प्रमाणित प्रती जोडाव्यात. त्याचप्रमाणे त्यांनी पूर्वीच्या वरिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतला असल्यास त्या महाविद्यालयाचा हस्तांतर दाखला (TC) मिळण्याबाबत अर्ज केलेला असला पाहिजे.

३) बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. भाग १ या वर्गात नविन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ पात्रता प्रमाणपत्राचा (Eligibility) अर्ज व शुल्क रु. ७५/- (बाहेरच्या राज्यातून आलेल्या विद्यार्थ्यांसाठी रु. ३००/-) कार्यालयात सादर केला पाहिजे. हाच नियम शिवाजी विद्यापीठाखेरीज अन्य विद्यापीठातून शिक्षण घेऊन या महाविद्यालयात पहिल्यांदाच प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहील. अशा विद्यार्थ्यांना स्थलांतर दाखला (Migration Certificate) मिळण्यासाठी वेगळा अर्ज पूर्वीच्या विद्यापीठाकडे करावा लागतो.

४) प्रवेश घेतेवेळी पालकांची उपस्थिती आवश्यक आहे अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही.

५) प्रवेश अर्जावर संबंधित शाखेच्या/वर्गाच्या/विषयांच्या प्रवेश समिती सदस्यांची स्वाक्षरी शिफारस म्हणून घ्यावी. नंतरच या अर्जावर मा. प्राचार्यांची प्रवेश दिल्याबद्दल स्वाक्षरी घ्यावी.

६) अशा पध्दतीने पूर्ण असलेला प्रवेश अर्ज त्यासोबतच्या विहित कागदपत्रासह कार्यालयात सादर करावा. शुल्क/अनामत रक्कम भरुन पावत्या घ्याव्यात. या पावत्या जपून ठेवाव्यात.

६) **प्रवेश प्रक्रिया पध्दत** : अ) माहितीपत्रक घेणे ब) प्रवेश फॉर्म भरणे क) शिष्यवृत्ती फॉर्म व इतर सवलतीचे फॉर्म बिनचूक भरुन डॉ. सौ.एम.बी.कुरणे व श्री.वायदंडे बी.बी. यांचेकडून तपासून घेणे. ड) ॲन्टी रॅगींग फॉर्म पूर्ण भरुन घेणे. इ) लायब्ररी फॉर्म व तीन रंगीत आयकार्ड साईज फोटो देणे. ई) प्रतिज्ञापत्र, हमीपत्र इ. फॉर्म भरुन देणे आवश्यक आहे.

७) **प्रवेश प्रक्रिया कालावधी** : प्रथम वर्ष बी.ए., बी.कॉम व बी.एस्सी. साठी प्रवेश प्रक्रिया कालावधी खालीलप्रमाणे आहे. एकूण १२० जागा अनुदानित (५०% खुला वर्ग + ५०% आरक्षित)

अ) इ. १२ वी निकालापासून १५ दिवस : माहितीपत्रक व प्रवेश अर्ज स्विकारणे (प्रवेश अर्जासोबत आवश्यक ती सर्व कागदपत्रे Xerox Copy जोडणे गरजेचे आहे.)

१) शाळा सोडल्याचा दाखला (२ प्रती) २) गुणपत्रिका (२ प्रती) ३) फोटो (२ प्रती)
४) आधार कार्ड ५) रेशन कार्ड

ब) त्यानंतरचे पुढील ५ दिवस :- प्रवेश अर्ज छाननी करुन प्रवेशीत यादी व प्रतिक्षा यादी तयार करुन नोटीस बोर्डवर लावणे.

क) त्यानंतर पुढील ५ दिवस : मूळ कागदपत्र व प्रवेश फी भरुन प्रवेश कायम करणे.

ड) त्यानंतर जागा रिकाम्या राहिल्यास/झाल्यास प्रतिक्षा यादीमधील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल.

८) **प्रवेश रद्द करणे** : एकदा दिलेला प्रवेश रद्द करण्यासाठी विद्यार्थी व पालकांच्या सहयांचा अर्ज सादर केला पाहिजे. प्रवेश रद्द करताना विद्यार्थ्याला संपूर्ण सत्राचे शिक्षण शुल्क भरावे लागेल.

९) एकदा प्रवेश घेतल्यानंतर शाळा सोडल्याचा दाखला (इ. १०/१२ वी मुळप्रत) परत मिळणार नाही. याकरिता प्रवेश घेण्याअगोदर दाखल्याचा जादा प्रमाणित प्रती काढून स्वतःकडे ठेवाव्यात.

## २.२ विद्यार्थी हजेरी (Students Attendance) :-

शासन परिपत्रक कं. टीईएम् ३३९६ (७४९८)तांशि - १ मंत्रालय मुंबई दि. १७ जुलै १९९६ नुसार उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजना विभागांतर्गत असलेल्या कला, विज्ञान, वाणिज्य विधी, शिक्षण अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, कलाशास्त्र महाविद्यालये व तंत्रनिकेतनचे तसेच इतर पदवी व संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी संबंधित परीक्षा यंत्रणेद्वारे परीक्षेत बसू देण्यास पात्र ठरविण्यासाठी ठराविक ८० % उपस्थिती अनिवार्य करण्यात आलेली आहे. सर्व विद्यार्थ्यांना Biometry Attendance अनिवार्य करण्यात आले आहे. जर विद्यार्थ्याने आपल्या उपस्थितीची किमान टक्केवारी पूर्ण केली नाही तर त्यास परीक्षेस बसण्यासाठी अपात्र ठरवण्यात येईल तेव्हा सर्व विद्यार्थ्यांनी त्यांच्या सर्व विषयांच्या तास व प्रात्यक्षिकास हजर रहाणे बंधनकारक आहे.



CamScanner

## २.३ ओळखपत्र (Identity Card) :-

महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याजवळ स्वतःचा फोटो असलेले ओळखपत्र (Identity Card) कार्ड असले पाहिजे. हे ओळखपत्र ग्रंथालयातून विद्यार्थ्यांना दिले जाते. परीक्षा, विविध उपक्रम व स्पर्धा यासाठी ओळखपत्र अत्यंत आवश्यक आहेच, तसेच महाविद्यालयाच्या आवारात ओळखपत्र असल्याशिवाय विद्यार्थ्यास प्रवेश दिला जाणार नाही.

## २.४ ड्रेसकोड (Dress Code) :-

सन २०१८-२०१९ पासून कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय या वर्गांना ड्रेसकोड सुरु करण्यात आलेले आहे.

## २.५ शासनाचे विविध दाखले घेण्यासाठी विद्यार्थ्यांना लागणारी कागदपत्रे

### अ) जातीचा दाखला

१) अर्जदार यांचा शाळेचा दाखला
२) तलाठी जातीचा दाखला व रहिवासी दाखला
३) अर्जदार यांचे वडील/चुलते/अजोबा/आत्या यांचा शाळेचा दाखला
४) दाखल्याचे प्रतिज्ञापत्र
५) रेशनकार्ड झेरॉक्स प्रत

### ब) मुस्लिम व कुणबी दाखल्यासाठी सेतूमध्ये संपर्क साधावा

(SC व ST १९५० पूर्वीचा OBC - १९६१ VJ/NT -१९६१ चे पुरावा SBC - १९६५)

| | |
|---|---|
| एस. सी. - | महार, मांग, चांभार, ढोर, लोहार, बौध्द (पुरावा १९५० पुर्वीचा) |
| ओबीसी - | कुंभार, न्हावी, माळी, गुरव, परीट, भाट, जंगम, कासार, शिंपी, सोनार, तांबट, तेली, लोणारी, कुणबी, वैश्य वाणी, वाणी (पुरावा १९६१ पुर्वीचा) |
| व्ही. जे. - | वडार, रामोशी, कैकाडी, लमाण (पुरावा १९६१ पुर्वीचा) |
| एन्. टी. - | गोसावी, लोहार, गोंधळी, गोपाळ, कोल्हाटी, नंदिवाले, रावळ, भोई, ओतारी, धनगर, वंजारी, गवळी (पुरावा १९६१ पुर्वीचा) |
| एस.बी.सी. - | साळी, कोळी, कोष्टी (पुरावा १९६५ पुर्वीचा) |

### क) उत्पन्नाचा दाखला

१) अर्जदार यांचा उत्पन्नाचा दाखला
२) तहसिलदार उत्पन्नाचा व रहिवासी दाखला
३) रेशन कार्ड झेरॉक्स प्रत
४) उत्पन्न १00000/- च्या वर असल्यास शुभ्र रेशनकार्ड असणे आवश्यक
५) उत्पन्न शेती पासून असल्यास ७/१२
६) उत्पन्न उतारा नोकरी पासून असल्यास पगारपत्रक व १६

### ड) डोमीसाईल दाखला/रहिवासी दाखला

१) अर्जदार यांचा शाळेचा दाखला
२) तलाठी रहिवासी दाखला
३) दाखल्याचे प्रतिज्ञापत्र
४) रेशनकार्ड झेरॉक्स प्रत

### इ) क्रिमीलेअर दाखला

१) अर्जदार यांचा शाळेचा दाखला
२) तलाठी तीन वर्षाचे उत्पन्नाचे दाखले व रहिवासी दाखला
३) दाखल्याचे प्रतिज्ञापत्र
४) रेशनकार्ड झेरॉक्स प्रत

### ई) शेतकरी दाखला

१) अर्जदार यांचा ७/१२ खाते उतारा
२) तलाठी शेतकरी असलेला दाखला व रहिवासी दाखला
३) दाखल्याचे प्रतिज्ञापत्र
४) रेशनकार्ड झेरॉक्स प्रत

## ३.३ वरिष्ठ महाविद्यालय - शास्त्र विभाग (Senior Science Faculty) :-

### ३.३.१ बी.एस्सी. भाग -१ (B.Sc. Part - I) :- (पाच विषय) (सेमिस्टर १ व २)

अनुदानित १२० जागा (120 Seats) या वर्गासाठी सेमिस्टर पध्दती सुरु आहे.

**१) आवश्यक विषय** (Compulsary) **इंग्रजी** (English)

**२) वैकल्पिक विषय** (Optional Subjects) **(अ किंवा ब पैकी एक ग्रुप)**

**लोकशाही निवडणूक व सुशासन हा विषय सर्वांना सक्तीचा आहे.**

| विभाग 'अ' (Group A) ६० जागा<br>गणित आवश्यक<br>PCME (३० जागा) व PCMS (३० जागा) | विभाग 'ब' (Group B) ६० जागा<br>PCBZ |
|---|---|
| १) पदार्थविज्ञान (Physics)<br>२) रसायनशास्त्र (Chemistry)<br>३) गणित (Mathematics)<br>४) इलेक्ट्रॉनिक्स (Electronics) किंवा<br>संख्याशास्त्र (Statistics ) | १) पदार्थविज्ञान (Physics)<br>२) रसायनशास्त्र (Chemistry)<br>३) वनस्पतीशास्त्र (Botany)<br>४) प्राणीशास्त्र (Zoology) |

C.B.C.S. Pattern प्रमाणे सन २०१९-२०२० या वर्षापासून B. Sc. अभ्यासक्रमामध्ये बदल करण्यात आला आहे. या संबंधीची सर्व माहिती प्रवेश घेतल्यानंतर दिली जाईल.

### ३.३.२ बी. एस्सी. भाग- २ (B. Sc. Part - II) :- (सेमिस्टर ३ व ४) अनुदानित १२० जागा

या वर्षासाठी सेमिस्टर परीक्षा पध्दती लागू आहे.

**'Environmental Studies' हा विषय सर्वांना सक्तीचा आहे.**

पुढीलपैकी कोणताही एक विभाग (Group) निवडावा. तथापी निवडलेले विषय विद्यार्थ्यांने बी.एस्सी. भाग १ मध्ये अभ्यासलेले असले पाहिजेत. (कंसात प्रवेश क्षमता)

**Group I - PCM (30)**
१) पदार्थविज्ञान (Physics)
२) रसायनशास्त्र (Chemistry)
३) गणित (Mathematics)

**Group II - PMS (15)**
१) पदार्थविज्ञान (Physics)
२) गणित (Mathematics)
३) संख्याशास्त्र (Statistics)

**Group III - PEM (15)**
१) पदार्थविज्ञान (Physics)
२) इलेक्ट्रॉनिक्स (Electronics)
३) गणित (Mathematics)

**Group IV - CBZ (60)**
१) रसायनशास्त्र (Chemistry)
२) वनस्पतीशास्त्र (Botany)
३) प्राणीशास्त्र (Zoology)

**Group V - PCB**
१) पदार्थविज्ञान (Physics)
२) रसायनशास्त्र (Chemistry)
३) वनस्पतीशास्त्र (Botany)



CamScanner

### ३.३.३ बी.एस्सी. भाग -३ (B.Sc. Part - III) :- (सेमिस्टर ५ व ६) अनुदानित १२० जागा

या वर्गाला सेमिस्टर पध्दत लागू आहे. या वर्गासाठी कोणताही एक विषय विशेष स्तरावर Principal Level अभ्यासता येतो. मात्र तो विषय विद्यार्थ्याने बी.एस्सी. भाग २ मध्ये अभ्यासलेला असला पाहिजे. विद्यार्थ्यांना विशेष स्तरावरील विषयांबरोबरच सक्तीचा इंग्रजी विषयाचा अभ्यास करावा लागतो. महाविद्यालयात खालील विषय विशेष स्तरावर अध्यापन करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

१) पदार्थविज्ञान (Physics) २) रसायनशास्त्र (Chemistry) ३) वनस्पतीशास्त्र (Botany)
४) प्राणीशास्त्र (Zoology) ५) गणित (Mathematics) ६) संख्याशास्त्र (Statistics)

* बी.एस्सी. भाग ३ या वर्गात प्रवेश देताना, प्रत्येक विषयासाठी (रसायनशास्त्राव्यतिरिक्त) १२ विद्यार्थ्यांना शासन नियम व गुणवत्तेप्रमाणे प्रवेश दिला जाईल. रसायनशास्त्र या विषयासाठी ५२ जागा असतील. या जागा भरताना शासन नियम व खालील निकषानुसार प्रवेश दिला जाईल.

१. बी.एस्सी.भाग २ च्या वर्गात रसायनशास्त्र हा विषय पास असावा.
२. बी.एस्सी.भाग २ मधील उपस्थिती व वर्तणूक चांगली असावी.
३. विद्यापीठाच्या परीक्षेत तो कॉपी केसमध्ये नसावा.

बी.एस्सी.भाग १,२ व ३ या वर्गाचे अध्यापन माध्यम इंग्रजी राहील. वरिष्ठ महाविद्यालयातील विनाअनुदानातील तुकडीतील प्रवेश फी हे संस्था, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व शासन मंजुरीच्या मान्यतेवर राहील. विनाअनुदान तत्वावर या महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र (बॉटनी) या विषयाला एम.एस्सी.(T & D) व एम्.फिल.(M.Phil.) पी.एच्.डी.(Ph.D.) ची सोय आहे.

## ३.४ वरिष्ठ महाविद्यालय - कला विभाग (Senior Arts Faculty) :-

या शाखेचे बी.ए. भाग १,२ व ३ वर्ग कार्यान्वित आहेत.

### ३.४.१ प्रथम वर्ष कला (बी.ए.भाग १) :- सत्र १ व २ अनुदानित (१२० जागा)

अ) सक्तीचे विषय (Compulsory subjects)
१) इंग्रजी (English)
२) विज्ञान तंत्रज्ञान आणि प्रगती (Science Technology & Development)

ब) ऐच्छिक विषय : खालीलपैकी कोणताही एक गट निवडावा.

| गट - १ | गट - २ | गट - ३ |
|---|---|---|
| १) मराठी (Marathi) | १) हिंदी (Hindi) | १) मराठी (Marathi) |
| २) भूगोल (Geography) | २) इतिहास (History) | २) हिंदी (Hindi) |
| ३) अर्थशास्त्र (Economics) | ३) अर्थशास्त्र (Economics) | ३) भूगोल (Geography) |
| ४) शा. शिक्षण (P. E.) / किंवा इंग्रजी (English) | ४) शा. शिक्षण (P. E.) / किंवा इंग्रजी (English) | ४) इतिहास (History) |

### ३.४.२ द्वितीय वर्ष कला (बी.ए.भाग २) (एकूण ६ पेपर्स) विषय - ४ : सत्र ३ व ४ अनुदानित (१२० जागा)

टिप : प्रथम वर्षातील (बी.ए.भाग १) चार ऐच्छिक विषयातील कोणतेही दोन विषय निवडणे आवश्यक

| सक्तीचे आवश्यक विषय | आंतरविद्या शासकीय विषय (कोणताही एक) | ऐच्छिक विषय (कोणताही एक गट) |
|---|---|---|
| १) इंग्रजी<br>२) पर्यावरणीय अभ्यास | १) पर्यटन भूगोल | १) भूगोल व मराठी २) भूगोल व हिंदी<br>३) भूगोल व अर्थशास्त्र ४) भूगोल व शा. शिक्षण |
| | २) महाराष्ट्रातील समाज सुधारकांचा इतिहास | १) इतिहास व मराठी २) इतिहास व हिंदी<br>३) इतिहास व अर्थशास्त्र ४) इतिहास व शा. शिक्षण |
| | | १) मराठी व अर्थशास्त्र<br>२) मराठी व शा. शिक्षण |

**३.४.३. तृतीय वर्ष कला (बी.ए.भाग ३) (एकूण ६ पेपर्स) :- सत्र ५ व ६ अनुदानित (१२० जागा)**

बी.ए.भाग ३ या वर्गात प्रवेश घेताना विद्यार्थी बी.ए.भाग १ मध्ये उत्तीर्ण असला पाहिजे.

१) सक्तीचा विषय :- इंग्रजी (एक पेपर)

२) स्पेशल विषय :- बी.ए.भाग २ मधील ऐच्छिक विषयांपैकी एका विषयाचे ५ पेपर्स विषय शिकवण्याची सोय आहे.

१) मराठी २) हिंदी ३) इतिहास ४) अर्थशास्त्र ५) भूगोल

**३.५ वरिष्ठ महाविद्यालय : वाणिज्य शाखा** (Commerce Faculty):- Non Grant

या शाखेचे बी. कॉम. भाग १, २ व ३ चे वर्ग सुरु आहेत. (विषय खालीलप्रमाणे)

**३.५.१ B.Com. - Part I सत्र १ व २ (१२० जागा)**

१) Business and Communication English
२) Principles of marketing
३) विमाशास्त्र (Insurance)
४) सुक्ष्म अर्थशास्त्र (Micro Economics)
५) व्यवस्थापनाची तत्वे व उपयोजन (Management, Principles & Application)
६) Financial Accounting

**३.५.२ B.Com. - Part II सत्र ३ व ४ (१२० जागा)**

१) Business and Communication English
२) Business Economics
३) Corporate Accounting
४) Business Statistics
५) उद्योजकतेची मूलभूत तत्वे (Fundamental of Enterpreneuship)
६) पैसा व अर्थपुरवठा पध्दती (Money and Financial System)

**३.५.३ B.Com. - Part III सत्र ५ व ६ (१२० जागा)**

१) व्यावसायिक पर्यावरण (Business Environment)
२) व्यवसाय नियमनविषयक कायदे (Business Regulatory Frame Work)
३) आधुनिक व्यवस्थापन पध्दती (Modern Management Practices)
४) सहकाराचा विकास (Co-Operative Development)
५) Advanced Accountancy - I
६) Advanced Accountancy - II



CamScanner

**३.५.४ संलग्नता :**

कृष्णा महाविद्यालयातील वरिष्ठ महाविद्यालयास शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व महाराष्ट्र शासनाची कायम मान्यता मिळाली आहे. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाची ही 2 f व 12 (B) कलमाखाली मान्यता मिळाली आहे.

**३.६ पदव्युतर विभाग :**

या महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विषयात M.Sc. (T&D) कोर्स चालू आहे. तसेच M.A. (हिंदी) भाग १ व २ वनस्पतीशास्त्र या विषयात M.Phil. व Ph.D. पदवीसाठी मार्गदर्शनाची सोय उपलब्ध आहे.

**३.७ सर्टिफिकेट कोर्सेस :**

सन २०१९-२० या वर्षापासून महाविद्यालयातील सर्व विभागामध्ये विद्यार्थ्यांच्या मध्ये संशोधन वृत्ती व कौशल्य विकास वाढीसाठी Certificate/Add-on courses सुरु करण्यात आलेले आहेत. या विषयाची सविस्तर माहिती प्रवेश घेतल्यानंतर दिली जाईल.

## Certificate/Add-on Courses 2019 - 2020

| Sr.No. | Department | Name of the Course |
|---|---|---|
| 1 | Physics/Electronics | Certificate course in maintenance and fitting of domestic wiring. |
| 2 | Mathematics | Certificate course in Scilab. |
| 3 | Chemistry | Certificate course in Alcohol Technology |
| 4 | Botany | * Certificate course in Hydroponic technique and organic farming.<br>* Add-on course in Nursery Technology |
| 5 | Zoology | * Certificate course in Beekeeping/Apiculture<br>* Add-on course in glass fish aquarium: Construction, management & maintenance |
| 6 | Marathi | Certificate course in भाषांतरण/रुपांतरण |
| 7 | Hindi | Certificate course in हिंदी भाषा प्रस्तुतीकरण कला |
| 8 | English | Certificate course in Spoken / Communicative English |
| 9 | Geography | Certificate course in Sustainable Tourisum |
| 10 | Economics | Certificate course in Practical Banking |
| 11 | History / NCC | Certificate course in Personality development and life skill cadre. |
| 12 | Library | Certificate course in Foundation course in competitive examinations. |
| 13 | Sports / Gymkhana | Certificate course in Yoga |
| 14 | Commerce | Certificate course in Taxation |



CamScanner

## ४ फी चा तपशील (Fee Chart)
### (Sr. Wing Fee) B. Sc. 2019 - 20

| No. | Class | B.Sc. I | B.Sc. II | B.Sc. III |
|---|---|---|---|---|
| 1 | Admission Fee | 10 | 10 | 10 |
| 2 | Tution Fee | 800 | 800 | 800 |
| 3 | Library Fee | 60 | 60 | 60 |
| 4 | Lab. Fee | 125 | 125 | 125 |
| 5 | Gymkhana Fee | 80 | 80 | 80 |
| 6 | Student Aid Fund | 25 | 25 | 25 |
| 7 | Paper Charges/Tutorial | 50 | 50 | 50 |
| 8 | Yuvak Mahostav | 55 | 55 | 55 |
| 9 | Development Fund | 50 | 50 | 50 |
| 10 | Magazine Fee | 10 | 30 | 30 |
| 11 | Ashwamedh | 30 | 30 | 30 |
| 12 | Lead College Fee | 25 | 25 | 25 |
| 13 | Students Insurance | 25 | 25 | 25 |
| 14 | Env. Science Fee | 00 | 275 | 00 |
| 15 | Proreta | 30 | 25 | 50 |
| 16 | E - Suvidha | 50 | 50 | 10 |
| 17 | Self Finance Unit | 10 | 10 | 00 |
| 18 | Eligibility Fee | 75 | 00 | 00 |
| 19 | Caution Money | 20 | 00 | 00 |
| | TOTAL - | 1530 | 1725 | 1450 |

## ४ फी चा तपशील (Fee Chart)
### (Sr. Wing Fee) B. A. 2019 - 20

| No. | Class | B.A. I | B.A. II | B.A. III |
|---|---|---|---|---|
| 1 | Admission Fee | 10 | 10 | 10 |
| 2 | Tution Fee | 800 | 800 | 800 |
| 3 | Library Fee | 70 | 70 | 70 |
| 4 | Magazine Fee | 10 | 10 | 10 |
| 5 | Gymkhana Fee | 100 | 100 | 100 |
| 6 | Student Adi Fund | 20 | 20 | 20 |
| 7 | Paper Charges | 50 | 50 | 50 |
| 8 | Yuvak Mahostav | 55 | 55 | 55 |
| 9 | Development Fund | 50 | 50 | 50 |
| 10 | Ashwamedh | 30 | 30 | 30 |
| 11 | Apatkalin Fund | 10 | 10 | 10 |
| 12 | Lead College Fee | 25 | 25 | 25 |
| 13 | Students Insurance | 25 | 25 | 25 |
| 14 | Env. Science Fee | 00 | 275 | 00 |
| 15 | Proreta | 30 | 30 | 30 |
| 16 | E - Suvidha | 50 | 50 | 50 |
| 17 | Self Finance Unit | 10 | 10 | 10 |
| 18 | Eligibility Fee | 75 | 00 | 00 |
| 19 | Caution Money | 20 | 00 | 00 |
| | TOTAL - | 1440 | 1620 | 1345 |

## ४ फी चा तपशील (Fee Chart)
## (Sr. Wing Fee) B. Com. 2019 - 20

| No. | Class | B.Com. I | B.Com. II | B.Com. III |
|---|---|---|---|---|
| 1 | Admission Fee | 10 | 10 | 10 |
| 2 | Tution Fee | 2500 | 3000 | 4000 |
| 3 | Library Fee | 70 | 70 | 70 |
| 4 | Magazine Fee | 10 | 00 | 00 |
| 5 | Gymkhana Fee | 100 | 100 | 100 |
| 6 | Student Aid Fund | 20 | 20 | 20 |
| 7 | Paper Charges / Tutorials | 50 | 50 | 50 |
| 8 | Yuvak Mahostav | 55 | 55 | 55 |
| 9 | Development Fund | 50 | 50 | 50 |
| 10 | Ashwamedh | 30 | 30 | 30 |
| 11 | Apatkalin Fund | 10 | 10 | 10 |
| 12 | Lead College Fee | 25 | 25 | 25 |
| 13 | Students Insurance | 25 | 25 | 25 |
| 14 | Env. Science Fee | 00 | 275 | 00 |
| 15 | Proreta | 30 | 30 | 30 |
| 16 | E - Suvidha | 50 | 50 | 50 |
| 17 | Self Finance Unit | 10 | 10 | 10 |
| 18 | Eligibility Fee | 75 | 00 | 00 |
| 19 | Caution Money | 20 | 00 | 00 |
| | TOTAL - | 3140 | 3810 | 4535 |

CamScanner

## ४ फी चा तपशील (Fee Chart)

(Sr. Wing Fee) M. A. 2019 - 20

| No. | Class | M.A. I | M.A. II |
|---|---|---|---|
| 1 | Admission Fee | 10 | 10 |
| 2 | Tution Fee | 5000 | 5000 |
| 3 | Library Fee | 50 | 50 |
| 4 | Gymkhana Fee | 00 | 00 |
| 5 | Student Adi Fund | 100 | 100 |
| 6 | Paper Charges / Tutorial | 20 | 20 |
| 7 | Yuvak Mahostav | 55 | 55 |
| 8 | Development Fund | 35 | 35 |
| 9 | Ashwamedh | 50 | 50 |
| 10 | Apatkalin Fund | 30 | 30 |
| 11 | Lead College Fee | 10 | 10 |
| 12 | Students Insurance | 25 | 25 |
| 13 | Proreta | 25 | 25 |
| 14 | E - Suvidha | 30 | 30 |
| 15 | Self Finance Unit | 50 | 50 |
| 16 | Eligibility Fee | 10 | 10 |
| 17 | Registration Fee | 75 | 00 |
| 18 | Magazine Fee | 50 | 00 |
| 19 | Caution Money | 15 | 15 |
| | TOTAL - | 5640 | 5515 |

## ५ फी परतावा (Refund of fees/deposits) :-

विद्यार्थ्याने आपला प्रवेश रद्द करणेबाबतचा लेखी अर्ज महाविद्यालयाकडे शैक्षणिक वर्ष सुरु झालेनंतर दिल्यास **प्रवेश फी, टर्म फी, लॅब फी दिली जाणार नाही.** परंतु ट्यूशन फी चा योग्य भाग परत केला जाईल. विद्यार्थ्याची महाविद्यालयाकडे असलेली ठेव (Deposits) विद्यार्थ्याने महाविद्यालय सोडल्यापासून ६ महिने पर्यंत मागणी केल्यास पूर्णपणे परत केली जाईल. अन्यथा ठेव परत दिली जाणार नाही. डिपॉझिटची रक्कम विद्यार्थ्याने अर्ज केल्यानंतर १५ दिवसांत अदा केली जाईल. रक्कम अदा करतेवेळी विद्यार्थ्याने आपले ओळखपत्र महाविद्यालयाकडे जमा करणे बंधनकारक आहे.



CS CamScanner

## ६ शिस्त व वर्तणूक (Discipline & Code of Conduct) :-

१) कडक शिस्तीचे वातावरण हे महाविद्यालयाचे वैशिष्टय आहे त्यानुसार अमलात असणारे नियम पाळणे प्रत्येक विद्यार्थ्यावर बंधनकारक आहे.

२) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील तास, प्रात्यक्षिके व परीक्षा यांना हजर राहणे आवश्यक आहे. तास, प्रात्यक्षिक चालू असताना विनाकारण महाविद्यालयाच्या आवारात फिरणाऱ्या विद्यार्थ्यावर दंडात्मक कारवाई केली जाईल.

३) महाविद्यालयात उपस्थित असताना प्रत्येक विद्यार्थ्याजवळ ओळखपत्र असलेच पाहिजे. ते मागणी केल्यास महाविद्यालयातील शिस्त कमिटीस अवलोकनार्थ सादर केले पाहिजे.

४) महाविद्यालयातील फर्निचर, क्रिडा साहित्य व प्रयोग शाळा साहित्य इ. मालमत्तेचा विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक वापर करणे आवश्यक आहे. त्याबाबत मोडतोड झाल्यास संबंधित विद्यार्थ्याकडून नुकसान भरपाई वसूल केली जाईल किंवा परिस्थितीनुसार सामुदाईक दंड केला जातो.

५) मा. प्राचार्यांच्या पूर्वसंमतीशिवाय विद्यार्थ्यांनी कोणतेही मंडळ स्थापन करु नये. अगर कोणत्याही कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयाच्या आवारात करु नये.

६) वादग्रस्त बाबीसंबंधी मा. प्राचार्यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

७) कॉमन ऑफ घेणाऱ्या वर्गांना सामुदाईक दंड केला जाईल. त्या दिवसांचा अभ्यासक्रम परत शिकविला जाणार नाही.

८) पालक सभेस पालकांची उपस्थिती आवश्यक आहे.

९) महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर करु नये. पालकांनी आपल्या पाल्यांना मोबाईल देवू नयेत. महाविद्यालयाच्या आवारात मोबाईलचा वापर केल्यास मोबाईल जप्त करुन रु. ५००/- एवढा दंड आकारण्यात येईल.

१०) महाविद्यालय कार्यालयात इंटरनेट, फॅक्सची सुविधा उपलब्ध केली आहे.

११) महाविद्यालय कार्यालयात सूचना पेटी (Suggestion box) आहे. त्यात आपल्या सूचना टाकाव्यात.

१२) अँटी रॅगिंग प्रतिबंधक नियमानुसार प्रत्येक विद्यार्थ्यास या संदर्भात शपथपत्रे प्रवेश घेताना भरुन द्यावयाची आहेत. म.शा.रॅ.प्र. नियम १९९१ नुसार रॅगिंग करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

## ७ विद्यापीठ परीक्षेसंबंधी नियम (University Exam.) :-

१) शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी या विषयाखेरीज प्रत्येक विषयांची प्रात्याक्षिक परीक्षा अंतभूर्त असते. तसेच बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. भाग १ मधील विद्यार्थ्याकरिता वर्षअखेरीस १० गुणांची शारीरिक शिक्षण विषयाची परीक्षा घेतली जाते.

२) परीक्षा प्रत्येक विद्यार्थ्याला अनिवार्य असून त्यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याने समाधानकारक प्रगती दाखविली पाहिजे.

३) विद्यार्थ्यांची तास व प्रात्याक्षिक यांना किमान ९० % उपस्थिती असली पाहिजे.

४) महाविद्यालयाने घेतलेल्या सर्व चाचणी परीक्षा, प्रथम सत्र परीक्षा, प्रात्याक्षिक परीक्षा (ज्या लागू असतील त्या) या परीक्षामध्ये किमान ३५ % गुण असले पाहिजेत.

५) परीक्षा अर्ज भरल्यानंतर वरील बाबींची पूर्तता असली पाहिजे अन्यथा परीक्षा अर्ज बोर्डाकडून/विद्यापीठाकडून परत मागविला जाईल.

६) प्रथम सत्र परीक्षा, सराव परीक्षा सुरु होण्यापूर्वी प्रत्येक विद्यार्थ्याने विहित नमुन्यातील हॉल तिकीट (Exam admit card/Hall ticket) व ओळखपत्र असणे बंधनकारक आहे. अन्यथा त्या विद्यार्थ्यास परीक्षेस बसू दिले जाणार नाही.

## ८ ग्रंथालय व अभ्यासिका (Library & Study Room) :-

१) ग्रंथालय हा शैक्षणिक संस्थेचा आत्मा समजला जातो. त्याला अनुसरुन ग्रंथालय समृध्द व अद्यायावत करण्याबाबत महाविद्यालयात विशेष योजना कार्यान्वित आहे.

२) महाविद्यालयाच्या ग्रंथालयात पाठयपुस्तके, पुस्तके व संदर्भ ग्रंथ यांची संख्या २५ हजारावर गेली आहे. ग्रंथालयातून पुस्तके ८ दिवसांच्या मुदतीसाठी दिली जातात.

३) ग्रंथालयामार्फत बुक बँक योजना कार्यान्वित आहे. त्या अंतर्गत विद्यार्थ्यांना अनामत रक्कम स्वीकारुन पुस्तकांचा संच वर्षभर अभ्यासाकरिता परीक्षेनंतर परत करण्याच्या अटीवर दिला जातो. या सुविधेसाठी विद्यार्थ्याकडून नाममात्र शुल्क घेतले जाते.

४) ग्रंथालयाने अभ्यासक्रमाशी संबंधित व सर्वसाधारण अशी सुमारे ४० नियतकालिके विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलबध केली आहेत.

५) विद्यार्थ्यांना पुढील अभ्यासक्रम निवडण्यासाठी व स्पर्धात्मक परीक्षेची तयारी करण्यासाठी उपयुक्त अशी (व्यवसाय मार्गदर्शन संबंधीत) नियतकालिके ग्रंथालयात उपलब्ध आहेत.

६) ग्रंथालयास जोडूनच प्रशस्त अशी अभ्यासिकेची सुविधा उपलब्ध आहे.

७) परीक्षा कालावधीत अभ्यासिका सकाळी ८ ते रात्री १० पर्यंत उघडी असते तसेच विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पुस्तके, नियतकालिके केंव्हाही उपलब्ध करुन दिल्या जातात.

८) प्रत्येक वर्गात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यास अभ्यासाकरिता पुस्तकांचा एक पूर्ण संच दिला जातो.

९) ३ ते ४ मुलांच्या गटात मागणी केल्यास ई बुक्स, ई जर्नल्स, इंटरनेट सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिल्या जातात.

## ९ एन.सी.सी./एन्.एस्.एस्./शारिरीक शिक्षण :-

१) महाविद्यालयात एन्.सी.सी./एन्.एस्.एस्. योजना (वरिष्ठ विभाग) कार्यान्वित आहेत. त्यात विद्यार्थ्यांना सहभागी होता येते. संबंधीत योजनांच्या परीक्षा शिबिरे इ. साठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. (एन्. एस्. एस्. वरिष्ठ महाविद्यालय १०० जागा व एन्.सी.सी. ७२ जागा.)

२) शिवाजी विद्यापीठ नियमानुसार बी.ए.,बी.कॉम. व बी.एस्सी. भाग १ वर्गासाठी १० गुणांची सक्तीची शा. शिक्षण योजना कार्यान्वित आहे. जर विद्यापीठाच्या परीक्षेत जास्तीत जास्त दोन विषयात अनुत्तीर्ण असेल तर या परीक्षेचे १० गुण त्याला उत्तीर्ण करण्यासाठी विचारात घेतले जातात.

३) विविध देशी, विदेशी खेळांची सुविधा व मार्गदर्शन विद्यार्थ्यांना शा. शिक्षण विभागामार्फत दिले जाते. तसेच अद्यावत मल्टी जिम सुविधा उपलब्ध आहे.

४) विद्यापीठ खेळाडू व राज्यस्तरीय खेळाडूंना शासनाच्या व विद्यापीठांच्या नियमाप्रमाणे सवलतीचे गुण दिले जातात.

## १० वसतीगृह (Hostel) :-

१) महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी सर्व सोयींनी युक्त असे स्वतंत्र वसतीगृहाची सुविधा उपलब्ध आहे. निवासाची सोय नाममात्र शुल्कासह केली जाते.

२) वस्तीगृहाच्या सुविधा मिळण्याबाबत प्रवेश घेताना वसतीगृह अधिक्षकाकडे चौकशी करावी. वसतीगृह अधिक्षकाकडून वसतीगृहाची स्वतंत्र नियमावली (सुविधा, नियम, शुल्क इ.) विद्यार्थ्यांना/पालकांना पहावयास मिळेल.



CamScanner

## ११.१ शिष्यवृत्त्या व पारितोषिके (Scholarships & Freeships) :-

विविध शिष्यवृत्त्या व सवलती विद्यार्थ्यांना मिळण्याच्या दृष्टीने महाविद्यालयामार्फत योग्य ती पूर्तता केली जाते.

१) ई.बी.सी./प्राथमिक शिक्षक/माध्य. शिक्षक/उच्च माध्य. शिक्षक/स्वातंत्र्य सैनिक/जवान यांच्या पाल्यांना मिळणारी शिक्षण शुल्क सवलत. इ. १२ वी पर्यंत मुलींना मोफत शिक्षण सवलत.

२) राष्ट्रीय / राज्य / गुणवत्ता व विद्यापीठ शिष्यवृत्ती. ३) अपंग विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती.

४) विद्यापीठाच्या विविध विषयांसाठीच्या शिष्यवृत्त्या.

५) **शासन नियमानुसार वरील सर्व सवलतीचे व शिष्यवृत्तीचे अर्ज प्रवेशानंतर १५ दिवसाचे आत सादर करणे अनिवार्य आहे.**

६) शिष्यवृत्तीबाबतची माहिती व नियम विद्यार्थ्यांना कार्यालयात पहावयास मिळतील.

७) शिष्यवृत्त्याप्रमाणेच गुणवत्ता क्रमांक मिळविणारे विद्यार्थी व विद्यापीठ/राज्य/राष्ट्रीय पातळीवरील क्रिडा स्पर्धेत विशेष यश संपादन करणारे विद्यार्थी यांना महाविद्यालय/संस्था व शिक्षक यांचेमार्फत आकर्षक पारितोषिके दिली जातात.

८) ई.बी.सी. सवलत फॉर्म सोबत तहसिलदार यांचा उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे. (उत्पन्नाची मर्यादा १ लाख पेक्षा कमी)

## ११.२ बी.सी. शिष्यवृत्तीः

एस.सी./एन.टी./ओ.बी.सी./एस.बी.सी./प्रशिप/अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे असल्याने सोबत खालीलप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

**(इयत्ता ११ वी ते T.Y. पर्यंत)**

**१) इ. १० वी चे गुणपत्रक व शेवटच्या गुणपत्रकांची झेरॉक्स.**
**२) उत्पन्नांचा दाखला सत्यप्रत ३) जातीचा दाखला**
**४) शाळा सोडल्याचा दाखला सत्यप्रत ५) आधार कार्ड झेरॉक्स ६) गुणपत्रक झेरॉक्स**
**७) राष्ट्रीयकृत बँकेत स्वतःचे खाते असणे आवश्यक आहे.**
**८) बँक पासबुक झेरॉक्स ९) रंगीत दोन फोटो**

**(टिप :- बी.सी. स्कॉलरशिप ऑनलाईन भरुन त्याची प्रिंट सोबत वरीलप्रमाणे सर्व कागदपत्रे जोडून प्रवेश दिनांक पासून १५ दिवसांच्या आत ऑफिसमध्ये जमा करणे आवश्यक आहे.)**

शिष्यवृत्ती संदर्भात शासनाकडून आलेल्या सुचना नोटीस फलकात लावल्या जातील. त्यानुसार संबंधीत विद्यार्थ्यांनी कार्यालय अधिक्षक व संबंधीत लिपीक यांचेशी त्वरीत संपर्क साधून कागदपत्रांची पुर्तता वेळेत करावी.

## १२ उपहारगृह (Canteen) :-

विद्यार्थी व कर्मचारी यांच्या सोईसाठी महाविद्यालयाच्या आवारात उपहारगृहाची सोय उपलब्ध आहे.

## १३ शैक्षणिक वार्षिक आराखडा (Academic Calender) :-

- प्रथम सत्र - गुरुवार दि. ११ जून २०१९ ते गुरुवार दि. २४ ऑक्टोंबर २०१९
- द्वितीय सत्र - गुरुवार दि. २१ नोव्हेंबर २०१९ ते रविवार दि. ०३ मे 2020
- दिपावली सुट्टी दि. २५ ऑक्टोंबर २०१९ ते दि. २० नोव्हेंबर २०१९

महाविद्यालयातील विविध शैक्षणिक उपक्रमा संदर्भात सर्व विद्यार्थ्यांना स्वतंत्र कॅलेंडर दिले जाईल व त्यानुसार शैक्षणिक आराखडा राबवला जाईल.

## १४.१ वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यमान प्राध्यापक वर्ग

प्राचार्य : डॉ. सी. बी. साळुंखे M.Sc.,Ph.D.

### ✻ शास्त्र शाखा ✻

- वनस्पतीशास्त्र विभाग (Botany)

१) डॉ. एम्. एस्. बनसोडे M.Sc.,M.Phil.,Ph.D.
२) डॉ. सी. बी. साळुंखे M.Sc.,Ph.D.
३) डॉ. एस्. एच्. जाधव M.Sc.,M.Phil,Ph.D.

- पदार्थविज्ञान विभाग (Physics)

१) डॉ. डी. एस. दळवी M.Sc.,Ph.D.

- इलेक्ट्रॉनिक्स विभाग (Electronics)

१) प्रा. बी. एस. माने M.Sc.,B.Ed.

- रसायनशास्त्र विभाग (Chemistry)

१) प्रा. सी. वाय. चव्हाण M.Sc.,M.Phil.
२) प्रा.कु. व्ही. एल. कांबळे M.Sc., SET

- गणित विभाग (Mathematics)

१) प्रा. एच्. व्ही. पाटील M.Sc.,M.Phil.

- संख्याशास्त्र विभाग (Statistics)

- प्राणीशास्त्र विभाग (Zoology)

१) प्रा.डॉ. एस्. एस्. पाटील M.Sc.,Ph.D.

- इंग्रजी विभाग (English)

१) प्रा. एस्. टी. तेलवेकर M.A.,B.Ed.

### ✻ कला शाखा ✻

- मराठी विभाग

१) डॉ. एम्. व्ही. कांबळे M.A.(SET),Ph.D.
२) प्रा. कु. एम्. एस्. पवार M.A.,B.Ed,SET,NET

- हिंदी विभाग

१) डॉ. आर. व्ही. गवळी M.A.,M.Phil.,Ph.D.
२) डॉ. सौ. एम्. व्ही. कुरणे M.A.,M.Phil.,Ph.D.

- भूगोल विभाग

१) डॉ. पी. डी. भाकरे M.A., Ph.D., SET, NET
२) प्रा. एन्. व्ही. गायकवाड M.A.,B.Ed.
३) डॉ. सौ. एस्. एम्. राजहंस M.A.,B.Ed.,Ph.D.

- इतिहास विभाग

१) डॉ. सौ. आर. डी. निकम M.A.,M.Phil.,Ph.D.
२) डॉ. व्ही. के. सोनवणे M.A.(SET),Ph.D.

- अर्थशास्त्र विभाग

१) डॉ. डी. आर. कुंभार M.A.(SET),B.Ed.,Ph.D.
२) डॉ. डी. एन्. माने M.A.,Ph.D.

- शारिरीक शिक्षण विभाग

१) प्रा. एस्. आर. पाटील B.A.,M.P.Ed.

### ✻ वाणिज्य शाखा ✻

१) प्रा.श्रीमती व्ही. आर. शाळगांवकर M.Com.,B.Ed.
२) प्रा.श्रीमती एस्.एम्. जाधव M.Com.,B.Ed.
३) प्रा. कु. डी. बी. कणसे M.A.,B.Ed.

- जिमखाना विभाग

१) प्रा. व्ही. यू. साळुंखे M.A.,M.P.Ed.,SET

- ग्रंथालय विभाग

१) प्रा. ए. ए. थोरात-ग्रंथपाल M.A.,M.Lib. NET



CamScanner

## १५ प्रशासकीय सेवक वर्ग :

| अ.नं. | सेवकाचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १) | श्री. वायदंडे बी. बी. | कार्यालयीन अधिक्षक |
| २) | श्री. लाड ए. एस्. | वरिष्ठ लिपीक |
| ३) | श्री. जांभळे एस्. एम्. | कनिष्ठ लिपीक |
| ४) | श्री. शिंगाडे एस. ए. | कनिष्ठ लिपीक |
| ५) | श्री. पाटील व्ही. एच्. | कनिष्ठ लिपीक |
| ६) | श्री. कणसे बी. डी. | प्रयोगशाळा सहाय्यक |
| ७) | श्री. वळवके ए. एल. | प्रयोगशाळा सहाय्यक |
| ८) | श्री. पाटील ए. ए. | ग्रंथालय लिपीक |
| ९) | श्री. जाधव व्ही. पी. | प्रयोगशाळा परिचर |
| १०) | श्री. लोहार एम्. टी. | प्रयोगशाळा परिचर |
| ११) | श्री. खोत ए. एम्. | प्रयोगशाळा परिचर |
| १२) | श्री. पाटील पी. एच्. | प्रयोगशाळा परिचर |
| १३) | श्री. जानकर ए. डी. | प्रयोगशाळा परिचर |
| १४) | श्री. कणसे एम्. एस्. | प्रयोगशाळा परिचर |
| १५) | श्री. मदने व्ही. एम्. | प्रयोगशाळा परिचर |
| १६) | श्री. पाटील पी. एन्. | प्रयोगशाळा परिचर |
| १७) | श्री. बारिया के. बी. | प्रयोगशाळा परिचर |
| १८) | श्री. माने ए. डी. | प्रयोगशाळा परिचर |
| १९) | श्री. डोळस आर. के. | प्रयोगशाळा परिचर |
| २०) | श्री. माने बी. टी. | ग्रंथालय परिचर |
| २१) | श्री. गभाले डी. के. | ग्रंथालय परिचर |
| २२) | श्री. दांडेकर के. एस्. | ग्रंथालय परिचर |
| २३) | श्री. पवार जे. अे. | शिपाई |
| २४) | श्री. बळीवंत बी. डी. | शिपाई |
| २५) | श्री. सुतार टी. के. | शिपाई |
| ● व्यवसाय अभ्यासक्रम विभाग – | | |
| २६) | श्री. चव्हाण एस्. बी. | भांडारपाल |
| २७) | श्री. वारके बी. एन्. | प्रयोगशाळा परिचर |


राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद

NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL

An Autonomous Institution of the University Grants Commission

Certificate of Accreditation

The Executive Committee of the National Assessment and Accreditation Council on the recommendation of the duly appointed Peer Team is pleased to declare the Krishna Mahavidyalaya Rethare, Tal. Karad, Dist. Satara, affiliated to Shivaji University, Maharashtra as Accredited with CGPA of 2.85 on seven point scale at B+ grade valid up to March 27, 2022

Date : March 28, 2017

Director

# हमीपत्र

मी ________________________________

रा. ____________________ वर्ग ________________ शैक्षणिक

वर्ष                      मध्ये आपल्या महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छितो. माझी सदर वर्गातील उपस्थिती महाविद्यालयाने ठरवून दिलेल्या म्हणजेच एकूण कामकाजाच्या दिवसापैकी ८०% प्रमाणात भरली नाही तर महाविद्यालय / विद्यापीठ परिक्षेस बसण्यास मला अपात्र ठरविले जाईल याची मला माहिती असून असे घडल्यास त्या संदर्भात माझी कोणतीही तक्रार असणार नाही.

पालकांची स्वाक्षरी                    विद्यार्थ्याची स्वाक्षरी

प्राचार्य स्वाक्षरी

# हमीपत्र

## (शैक्षणिक शुल्काबाबत)

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार अनुदानीत/विनाअनुदानीत संस्थाच्या शैक्षणिक शुल्काचे पत्र नियमनासाठी शैक्षणिक संस्था विनियमन प्राधिकरणाची स्थापना महाराष्ट्र शासनाने केलेली आहे. (महाराष्ट्र शासन निर्णय क्र. युएसजी २००३/३३/०३/१/विशि - ४ मंत्रालय विस्तारभवन, मुंबई ३२) दि. १६/४/२००३ याची मला माहिती आहे.

त्यानुसार कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।। ता. कराड, जि. सातारा येथे मी शैक्षणिक वर्ष सन / या शैक्षणिक वर्षात शिकत असलेल्या अभ्यासक्रमात महाराष्ट्र शासन प्राधिकरण जे शुल्क प्रमाणित करेल ते भरण्यास मी बांधील आहे. जर सदरचे वाढीव शुल्क मी वेळेवर भरले नाही तर महाविद्यालयातून माझे नांव कमी केल्यास / काढून टाकल्यास माझी कोणतीही हरकत असणार नाही म्हणून हे हमीपत्र लिहून दिले.

| सही<br>पालकाचे नांव | सही<br>विद्यार्थी/विद्यार्थीनीचे नांव |
|---|---|
| | |
| | |

# कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।

परिशिष्ट अ

## "प्रतिज्ञापत्र"

मी ____________________________________________

प्रतिज्ञा करतो/करते की माझ्या कुटुंबाची खालील माहिती सत्येवर आधारित आहे. ही माहिती खोटी आहे असे आढळून आल्यास त्याला मी जबाबदार असेन व त्यासाठी महाविद्यालयाने ठरविलेली शिक्षा मला मान्य राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | आईचे नांव व शैक्षणिक अहर्ता | : | |
| २. | आईचा उद्योग (Occupation) | : | नोकरी/व्यवसाय/शेती/इतर (नोकरी असल्यास वेतन प्रमाणपत्र जोडण्यात यावे.) |
| ३. | आईचे उत्पन्न | : | रु. |
| ४. | वडिलांचे नांव व शैक्षणिक अर्हता | : | |
| ५. | वडिलांचा उद्योग (Occupation) | : | नोकरी/व्यवसाय/शेती/इतर (नोकरी असल्यास वेतन प्रमाणपत्र जोडण्यात यावे.) |
| ६. | वडिलांचे उत्पन्न | : | रु. |
| ७. | कुटुंबाचे एकत्रित उत्पन्न | : | रु. |
| ८. | कुटुंबाचे स्वत:चे मालकीचे घर आहे काय ? | : | होय / नाही |
| ९. | नसेल तर भाडयाचे आहे काय? | : | |
| १०. | भाड्याचे असल्यास घराचे मासिक भाडे किती आहे? (पावती जोडावी) | : | |
| ११. | घराचे क्षेत्रफळ (चौरस फुट) | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | आपल्याकडे शेतजमीन आहे काय? जिरायती/ बागायती | : | होय / नाही |
| १३. | किती एकर शेतजमीन आहे ? | : | |
| १४. | शेतीपासून उत्पन्न | : | |
| १५. | आपल्या घरी समोर दिलेल्या वस्तूपैकी कोणत्या वस्तू आहेत ? (कृपया ✓ करावे) | : | १. मोटार सायकल<br>२. टेलिफोन<br>३. फ्रिज<br>४. ट्रॅक्टर<br>५. मोटार (चारचाकी)<br>६. वॉशिंग मशीन<br>७. म्युझिक सिस्टीम<br>८. मिक्सर / (फूड प्रोसेसर)<br>९. ए. सी. |
| १६. | आई/वडील आयकर दाते आहेत काय? (Please Submit last years Income tax returns Xerox copy) | : | होय / नाही |
| १७. | आयकर खाते क्र. | : | |
| १८. | आपल्याकडे कोणत्या रंगाची शिधापत्रिका आहे | : | पिवळी / केशरी / पांढरी |
| १९. | पालक/पाल्यांचा जीवन विमा/मेडिक्लेम काढला आहे काय ? | : | होय / नाही |
| २०. | असल्यास किती किंमतीचा? (कृपया भरत असलेल्या हप्त्याची पावती जोडावी.) | : | रु. |

पालकांची स्वाक्षरी

विद्यार्थ्याची / विद्यार्थीनीची स्वाक्षरी

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, रेठरे बु।। चे

# कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।। पो. शिवनगर

ता. कराड, जि. सातारा.

## • ओळखपत्र अर्ज •

दि. : / /२०१

विद्यार्थ्याचे पूर्ण नांव : (मराठी) ____________________

Name English ____________________

(Only in Capital Letters)

जन्म तारीख : / / वय : ____________________

कोणत्या वर्गात प्रवेश घेतला : ____________________

प्रवेश घेतल्याची तारीख : / / प्रवेश पावती क्र. : ____________________

आई / वडील / पालकाचे पूर्ण नांव : ____________________

कायमचा पत्ता : (मराठी) ____________________

Address English ____________________

(Only in Capital Letters)

____________________ फोन/मोबाईल क्रमांक : ____________________

विद्यार्थ्याचा राहण्याचा पत्ता : ____________________

____________________ फोन/मोबाईल क्रमांक : ____________________

ग्रंथपाल/क्लार्क सही | विद्यार्थ्याची/विद्यार्थीनीची सही | पालकाची सही

## ANNEXURE - I
## AFFIDAVIT BY THE STUDENT

1) I, ______________________ (full name of student with admission/registration/ enrolment numbers) s/o d/o Mr./Mrs./Ms. ______________________ ______________________ having been admitted to (name of the institution), have received a copy of the UGC Regulations on Curbing the Menace of Ragging in Higher Educational Institutions, 2009, (hereinafter called the "Regulation") carefully read and fully understood the provisions contained in the said Regulations.

2) I have, in particular, perused clause 3 of the Regulations and am aware as to what constitutes ragging.

3) I have also, in particular, perused clause 7 and clause 9.1 of the Regulations and am fully aware of the penal and administative action that is liable to be taken against me in case I am found guilty of or abetting ragging, actively or passively, or being part of conspriacy to promote ragging.

4) I hereby solemnly aver and undertake that

a) I will not indulge in any behaviour or act that may be constituted as ragging under clause 3 of the Regulations.

b) I will not participate in or abet or porpagate through any act of commission or omission that may be constituted as ragging under clause 3 of the Regulations.

5) I hereby affirm that, if found guilty of ragging, I am liable for punishment according to clause 9.1 of the Regulations, without prejudice to any other criminal action that may be taken against me under any penal law or any law for the time being in force.

6) I hereby declare that I have not been expelled or debarred from admission in any institution in the country on account of being found guilty of, abetting or being part of a conspiracy to promote, ragging, and further affirm that, in case the declaration is found to be untrue, I am aware that my admission is liable to be cancelled.

Declare this __________ day of __________ month of __________ year.

**Signature of student**

Name : ______________________

## ANNEXURE - II
## AFFIDAVIT BY PARENT / GUARDIAN

1) I, Mr./Mrs./Ms._________________________________________ (full name of parent/guardian) father/mother/guardian of ____________________________________________________ (full name of student with admission/registration/enrolment numbers) having been admitted to ____________________________________________ (name of the institution), have received a copy of the UGC Regulations on Curbing the Menace of Ragging in Higher Educational Institutions, 2009, (hereinafter called the "Regulation") carefully read and fully understood the provisions contained in the said Regulations.

2) I have, in particular, perused clause 3 of the Regulations and am aware as to what constitutes ragging.

3) I have also, in particular, perused clause 7 and clause 9.1 of the Regulations and am fully aware of the penal and administative action that is liable to be taken against my ward in case he/she is found guilty of or abetting ragging, actively or passively, or being part of conspriacy to promote ragging.

4) I hereby solemnly aver and undertake that

a) My ward will not indulge in any behaviour or act that may be constituted as ragging under clause 3 of the Regulations.

b) My ward will not participate in or abet or porpagate through any act of commission or omission that may be constituted as ragging under clause 3 of the Regulations.

5) I hereby affirm that, if found guilty of ragging, I am liable for punishment according to clause 9.1 of the Regulations, without prejudice to any other criminal action that may be taken against me under any penal law or any law for the time being in force.

6) I hereby declare that I have not been explelled or debarred from admission in any institution in the country on account of being found guilty of, abetting or being part of a conspiracy to promote, ragging, and further affirm that, in case the declaration is found to be untrue, I am aware that my admission is liable to be cancelled.

Declare this ______________ day of ______________ month of ________________ year.

**Signature of student**

Name : ____________________________

CS CamScanner